## थोडक्यात

### चहा विकणाऱ्याचा मुलगा झाला सी.ए.

लोकशाही न्यूज नेटवर्क
बोदवड प्रतिनिधी



येथील बाळासाहेब ठाकरे नगर येथील रहिवासी अनिल प्रभाकर कोकाटे यांचा मुलगा अंकीत सि. ए. फायनलची परीक्षा उच्च श्रेणी गुण मिळवून उत्तीर्ण झाला. मुलाचे स्वप्न व आई-वडिलांची मेहनत ही सफल झाली. अत्यंत हलाखालीच्या परिस्थितीमध्ये पंचवीस वर्षा अगोदर मुळगाव टाकरखेडा ता मोताळा येथील असलेले अनिल प्रभाकर कोकाटे हे उदरनिर्वासाठी बोदवड येथे आले. स्थायिक झाले. त्यांना दोन मुलं दोन मुली चारही उच्चशिक्षित आहे. स्वतः सातवी पास असलेले कोकाटे यांनी आपल्या मुलांना त्यांच्या व्यवसायाकडे कधी येवू दिले नाही. बेटा तुम्ही शिका. . काय लागते ते सांगा, मी ज्या संघर्षमय परिस्थितीमध्ये जीवन जगलो ते दिवस तुमच्यावर येवू नये... मुलगा पास झाल्याचा आनंद त्यांना झाला ते त्यांचे पत्नी शारदाताई यांनी पूर्ण कॉलनीमध्ये घरी जाऊन पेढे वाटून आनंद साजरा केला. दोन्हींचे डोळ्यातील अश्रू अनावर झाले. अंकितशी संपर्क साधला असता सीए चार्टर्डअकाऊटेट क्षेत्रात खूप वाव असून सीएच्या तीनही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कोणाला नोकरी मागायला जायची गरज पडत नाही आणि आज समाजामध्ये सिए खूप आवश्यकता असून अभ्यास केला तर सीए कठीण सुद्धा नाही व शिक्षण घेण्यासाठी जास्त पैसा सुद्धा लागत नाही. एक मुलगा म्हणून मी माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण केले असे त्यांनी मनोगत व्यक्त केले.

### निंभोऱ्यात गीत संगीत अन् सन्मान सोहळा




लोकशाही न्यूज नेटवर्क
निंभोरा प्रतिनिधी

निंभोरा बु. ता. रावेर येथील हिट अँड स्वीट कला ग्रुप तर्फे नुकताच तुमको ना भूल पायेंगे हा गीत संगीत कार्यक्रम व विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान पत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या सुरुवातिला सरस्वती माता व स्व. लता मंगेशकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन डॉ. केतकी पाटील, माजी पं स सभापती ज्योती बोन्डे, माजी जि प सदस्या पूनम पाटील, माजी नगराध्यक्ष नंदाबाई लोखंडे, माजी पं स सदस्या योगिता वानखेडे, सरपंच निर्मलाबाई कोळी, उपसरपंच रंजना पाटील, यासह मान्यवरांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी माजी आमदार अरुण दादा पाटील हे होते. यावेळी जळगाव जिल्ह्यासह रावेर तालुक्यातील स्वर्गीय माजी खासदार डॉ. गुणवंत राव सरोदे, स्व. माजी खासदार हरिभाऊ जावळे, स्व. माजी विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब चौधरी, स्व. माजी गृह राज्य मंत्री जे टी दादा महाजन, स्व. प्रल्हाद एकनाथ पाटील, स्व. शामराव मिठाराम तराळ, स्व. गोदावरी वासुदेव पाटील, स्व. माजी आमदार बाजीराव नाना पाटील तसेच निंभोरा व परिसरात ज्यांनी विविध क्षेत्रात कार्य केले अशा मान्यवारांना देखील स्मरण करून त्यांनाही श्रद्धांजली वाहण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रम संयोजक राजीव बोरसे यांनी केले. तर उपस्थितीतांचे स्वागत अध्यक्ष प्रल्हाद बोन्डे व डिगंबर चौधरी, दुर्गादास पाटील, नरेंद्र ढाके, सचिन चौधरी यासह गावातील मान्यवरांनी प्रमुख अतिथिंचे स्वागत केले. यावेळी प्रमुख अतिथी माजी आमदार अरुण पाटील, माजी जि प उपाध्यक्ष नंदकिशोर महाजन, डॉ. केतकी पाटील, श्रीकांत महाजन, पोलीस उपविभागीय अधिकारी अनिल बडगुजर, सपोनि हरिदास बोचरे, माजी पं स सदस्य प्रमोद रोझोदकर, हरीलाल कोळी, मोहन तायडे, विजय कुमार कोसोदे यासह मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यानंतर गीत संगीत कार्यक्रमात जुने नवे सदाबहार गीतांचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

### मराठी रंगभूमी दिन उत्साहात



लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

मराठी रंगभूमी दिना निमित्ताने आज (दि. ५ नोव्हेंबर) सकाळी अकरा वाजता बालगंधर्व खुले नाट्यगृह येथे रंगकर्मींच्या उपस्थितीत रंगदेवता नटराज तसेच नाट्य साहित्य व वाद्यांचे पूजन करून रंगभूमीला वंदन करण्यात आले. या पूजनाचा नारळ ज्येष्ठ रंगकर्मी चिंतामण पाटील यांच्या हस्ते फोडण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. उल्हास कडूस्कर लिखित शब्द सुरांच्या रेशीम गाठी या नाटकातील नांदीने झाली. खान्देश नाट्य प्रतिष्ठानचे दुष्यंत जोशी आणि संजय कुलकर्णी यांनी नांदी सादर केली. तबल्यावर मोहन रावतोळे आणि संवादिनीवर भूषण खैरनार यांनी साथ दिली. या प्रसंगी सर्व रंगकर्मींनी नटराजाला वंदन करून मराठी रंगभूमीच्या परंपरेला अभिवादन केले. कार्यक्रमाला ज्येष्ठ रंगकर्मी पियुष रावळ, विनय काबरा, संजय निकुंभ, चंद्रकांत अत्रे, गुलाब शेख, चंद्रकांत चौधरी, अरुण सानप, शरद पांडे, विनोद ढगे, योगेश शुक्ला, अनिल मोरे, जगदीश नेवे, गीतांजली ठाकरे, शरद भालेराव, आकाश बाविस्कर, प्रदीप भोई, अविनाश चव्हाण, भगवंत फडणीस, महेंद्र खेडकर, पवन खंबायत, बळवंत गायकवाड, नेहा पवार, शुभदा नेवे, धनंजय राजहंस, अविनाश मोघे, विजय पाठक, प्रा. सुधीर भटकर, गणेश सोनार, सचिन महाजन याचेसह अनेक कलारसिकांची उपस्थिती होती.

# बालरंगभूमी परिषदेची बदनामी करणाऱ्यांचा खोडसाळपणा उघड

**महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे केला सविस्तर खुलासा : सर्व २७ शाखांकडून समाधान व्यक्त**

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

गेले अनेक दिवस बालरंगभूमी परिषदेची वेगवेगळ्या संस्था व व्यक्तींकडून माध्यमांमध्ये बदनामी केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने सविस्तर खुलासा प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिला आहे. बालरंगभूमी परिषदेने यापुर्वी जाहीर केलेल्या भूमिकेप्रमाणे राज्य बालनाट्य स्पर्धा हायजॅक केली नाही तर दि. ४ ऑगस्ट २०२५ च्या पत्राप्रमाणेच बालरंगभूमी परिषद स्थानिक समन्वय व इतर बाबींमध्ये कार्यरत असणार आहे. सदर बाबीच्या खुलासा राज्य सरकारने केला आहे. त्यामुळे बदनामी करणाऱ्यांचा खोडसाळपणा उघड झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या बालकलाकारांबाबतच्या सर्व उपक्रमांमध्ये बालरंगभूमी परिषद सदैव सहकार्य करण्यास तत्पर आहे. महाराष्ट्रातील बालकलाकारांसाठी बालरंगभूमी परिषद कायम स्वतःचे उपक्रम राबवित राहील आणि नव्या पिढीसाठी कलाक्षेत्रात नवी दिशा देण्यासाठी बालरंगभूमी परिषद स्वतःला कार्यरत ठेवेल. सांस्कृतिक कार्य संचालनालयाने काढलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, बालरंगभूमी परिषद ही अखिल भारतीय नाट्य परिषदेशी संलग्न असल्यामुळे बालकांच्या भावविश्वाशी व कलागुणांशी संबंधित काम या संस्थेमार्फत चालत असते. त्यामुळेच बालनाट्य स्पर्धेत बालरंगभूमीने विना मोबदला स्थानिक आयोजनात सहकार्य आणि समन्वय करावे असे बालरंगभूमी परिषदेबरोबरच्या बैठकीत ठरलेले होते. त्यानुसार ४ ऑगस्ट, २०२५ रोजी बालरंगभूमी परिषदेस तसे पत्रही देण्यात आले होते. या पत्रानुसार समन्वयक नावे सुचवणे, परीक्षक नावे सुचवणे याबरोबरच अन्य काही बाबीसाठी बालरंगभूमी परिषदेने सहकार्य करावे असे नमूद करण्यात आले होते. बालरंगभूमी परिषदेने परिक्षकांची व समन्वयांची नावे सुचवली असली तरी, अंतिम निवड सांस्कृतिक कार्य संचालनालयाची आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाने बालरंगभूमी परिषदेस दिलेल्या पत्रामुळे काही माध्यमांमधून या पत्रांमधील काही मुद्द्यांवर आक्षेप घेण्यात आलेले होते. वास्तविक पाहता या पत्रामध्ये बालरंगभूमी परिषदेने स्पर्धा आयोजनात स्थानिक सहकार्य करावे आणि स्थानिक समन्वय करावा असे अभिप्रेत आहे, याचा अर्थ महाराष्ट्र राज्य हौशी बाल नाट्य स्पर्धा हायजॅक केली असा होत नाही. या पत्रामध्ये स्पष्टपणे बालरंगभूमी परिषदेने स्थानिक आयोजन सहकार्याने समन्वय करावा असे नमूद करण्यात आलेले होते. मात्र निवेदनाद्वारे काही संस्थानी ही स्पर्धा संपूर्ण आयोजनाकरीता दिली आहे असे म्हटले होते. स्पष्ट करण्यात येते की, यामध्ये काहीही तथ्य नाही. कारण कोणत्याही संस्थेस शासनाने ही स्पर्धा संपूर्णपणे आयोजन करण्यासाठी दिलेली नाही. या स्पर्धेदरम्यान स्थानिक सहकार्य आणि समन्वय करण्यासाठी बालरंगभूमी ही शासनास पुर्वीपासून मदत करत होती व यापुढेही मदत करेल अशी अपेक्षा आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या निर्णयाचा काही संस्थांनी विपर्यास केला तसेच या संदर्भात केलेल्या खुलासाचा नोंदणीकृत नसलेल्या एका रंगभूमी कलावंत संघटनेंने श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. तसेच राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांने देखील श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते, हे सांस्कृतिक चळवळीसाठी बाधक आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाने कोणत्याही संस्थेच्या किंवा राजकीय पक्षाच्या / संघटनेच्या राजकीय दबावाखाली बळी पडून हा निर्णय घेतलेला नाही. गेली अनेक वर्षे सांस्कृतिक कार्य संचालनालय विविध संस्थांची मदत घेऊन विविध स्पर्धा आयोजित करीत असते. त्यामुळे स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी कोणीही गैरसमज पसरवू नये. सदरील स्पर्धा पूर्णपणे पूर्वीपासूनच शासनाच्या नियंत्रणाखाली आहे. कोणत्याही खाजगी संस्थेला याचे अधिकार दिलेले नाहीत. त्यामुळे पूर्वीपासून शासनाच्या वतीने स्पर्धेचे नियोजन करण्यात येत असते, तसे यावर्षी देखील होणार आहे. या वृत्ताचे स्वागत बालरंगभूमी परिषदेच्या महाराष्ट्रातील सर्व २७ शाखांचे पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

## प्रज्ज्वल नावरकर सीए परीक्षा उत्तीर्ण

लोकशाही न्यूज नेटवर्क
पारोळा प्रतिनिधी



इन्टीट्यूट ऑफ चार्टड अकाऊंटंट ऑफ इंडियाच्या वतीने सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत पारोळा येथील प्रज्ज्वल विजय नावरकर याने घवघवीत यश मिळवले आहे. प्रज्ज्वल हा येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले, लाड शाखीय वाणी समाज मंडळाचे अध्यक्ष विजय नावरकर यांचा मुलगा आहे.

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे मिलिंद नावरकर यांचा पुतण्या आहे. त्याने त्याच्या यशाचे श्रेय आजपर्यंतच्या सर्व गुरुवर्य शिक्षकांना दिले आहे. या यशाबद्दल पारोळा वाणी समाज मंडळाचे उपाध्यक्ष हेमंकात मुसळे, उत्कर्ष ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. विकास सोनवणे, स्वयंसेवक संघाचे देविदास तिसे पारोळा व्यापारी महासंघ यांच्यासह अनेकांनी त्यांचे कौतुक केले आहे.

## भाषेचा वापर करताना सजग राहिले पाहिजे

लोकशाही न्यूज नेटवर्क
भडगाव प्रतिनिधी




मराठी भाषा ही अतिशय समृद्ध भाषा आहे. एकाच शब्दांचे अनेक अर्थ वापरण्यानुसार तयार होतात, शब्दांची जागा बदलली तरी अर्थ बदलतो अश्या भाषेविषयी आपणास सार्थ अभिमान असणे गरजेचे आहे. अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे या भाषेचा वापर करताना आपण अतिशय सजग राहिले पाहिजे असे विचार येथील केशवसूत ज्ञान प्रभोधिनी आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफतांना सुप्रसिद्ध वृत्त निवेदिका दिपाली केळकर (बदलापूर) यांनी व्यक्त केले. व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष राजेंद्र महादू पाटील, प्रशांत पाटील, विनोद पाटील, सौरभ पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. निसर्गातील अनेक पान, फुलं, फळ, खाद्यपदार्थ, यांचे विविध दाखले देत त्यांनी आपणास निसर्ग देखील बरेच काही शिकवत असतो आपण त्या कडे साहित्यिका च्या दृष्टीने पाहिले पाहिजे. आजचे आपले जीवनमान व पूर्वीचे जीवन यातील झालेला प्रचंड फरक त्यांनी श्रोत्यांना उलगडून दाखवला परंतु मानवी भाव भावना मात्र त्याच आहेत त्या जपण्यासाठी परस्परातील संवाद घडणे जास्त गरजेचे आहे जो आज मोबाईल च्या युगात कमी कमी होत चालला आहे. देशाची प्रगती व्हायची असेल तर पुढील पाच 'सी' अतिशय महत्वाचे आहेत भ्रष्टाचार, जातपात, टीका, तुलना आणि चारित्र्य असे त्यांनी प्रतिपादन केले. व्याख्यान मालेचे हे पहिले पुष्प प्रशांत व विनोद पाटील यांनी आपले पिताश्री स्वग्रीय पांडुरंग महादू पाटील यांच्या स्मृती पित्यर्थ प्रायोजित केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केशवसूत ज्ञान प्रभोधनीचे अध्यक्ष विजयराव देशपांडे यांनी तर सूत्रसंचालन व आभार सचिव प्रा. डॉ. दीपक मराठे यांनी केले.

## पारोळ्यात गुरुनानक जयंती उत्साहात

लोकशाही न्यूज नेटवर्क
पारोळा प्रतिनिधी



येथे सालाबादप्रमाणे यंदाही गुरूनानक जयंती पर्व व कार्तिक मास मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पारोळा शहरातील बाबा ज्युडियाराम साहेब मंदिराच्या वतीने मागील पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या कार्तिक मास पोथी वाचन प्रभातफेरी व गुरूनानक यांची ५५६ वी जयंती पर्व मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सकाळी ६ वाजता प्रभात फेरी चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संपूर्ण मार्गावर धन गुरू नानक सारा जग तारीया तसेच श्री राम जय राम जय जय राम च्या जयघोषाने संपूर्ण फेरी मार्गवर भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. तसेच याप्रसंगी संपूर्ण मार्गावर प्रभात फेरीच्या पुढे संपूर्ण मार्गावर झाडुने साफ सफाई करण्यात येत होती. तद् नंतर पंचामृत शिंपडून मार्ग पवित्र करुन त्या मार्गावर पवित्र अश्या रथाचे आगमन होत होते. तसेच संपूर्ण मार्गावर फटाक्यांची आतषबाजी करून प्रसादाचे वाटप करण्यात येत होते. त्यानंतर मंदिरात सुरु असलेल्या कार्तिक मास पोथीचे समापन करण्यात आले व रात्री मागील सव्वा महिन्यांपासून सुरू असलेल्या गुरू ग्रंथ साहेबला भोग साहेबचेही समापन करण्यात आले. यानंतर रात्री महाआरती करुन संपूर्ण कार्यक्रमांची सांगता करण्यात आली. याप्रसंगी मंदिरांचे प्रमुख व बाबा ज्युडियाराम साहेब यांचे नातु सांई हिरानंद व त्यांचे चिरंजीव यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## आदर्श आचारसंहिते पालन करा : तहसिलदार

लोकशाही न्यूज नेटवर्क
पारोळा प्रतिनिधी




राज्यातील नगरपालिका नगरपरिषद व नगर पंचायतीच्या निवडणूकीचा बिगुल वाजला व तसेच शहरातील नगर परिषदेच्या वतीने शहरातील बॅनर काढण्यासाठी लगबग सुरू झाली. शहरात आताच बालाजी महाराजांचा यात्रोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तसेच दसरा व दिपावली निमित्त ही शहरातील विविध भागात अनेक राजकीय नेत्यांचे सामाजिक कार्यकर्त्यांचे मोठ मोठे शुभेच्छा होर्डिंग्ज लावण्यात आले होते. हे सर्व होर्डिंग्ज जसेच निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केली तसेच आदर्श आचारसंहिता लागूही लागु झाल्याने शहरातील गल्ली बोळातील सर्व होर्डिंग्ज नगरपरिषदेच्या वतीने काढण्यात आले. यालाच अनुसरून आज नगरपरिषदेच्या मिंटीग हाल येथे सर्व राजकीय पक्ष सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार यांच्या बैठकीचे आयोजन येथील तहसिलदार डॉ उल्हासराव देवरे व पारोळा पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक पालकर यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी डॉ उल्हासराव देवरे यांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करा व सर्व राजकीय पक्षांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत सर्वांचे समाधान केले. तसेच त्यांनी सर्व उपस्थितांना सहकारी यंत्रणेला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

## शेंदुर्णी नगरपंचायतच्या रणधुमाळीस सुरुवात

लोकशाही न्यूज नेटवर्क
शेंदुर्णी प्रतिनिधी




शेंदुर्णी नगरपंचायतची रणधुमाळीस आचारसंहिता लागताच सुरुवात झाली असून त्याचाच एक भाग म्हणून आज जामनेर तहसीलदार नानासाहेब आगळे यांनी विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली व आदर्श आचारसंहिता पालन करण्याचे सूचना दिल्या. यात मतमोजणी केंद्र हे लोकवस्तीत न ठेवता शहराच्या बाहेर असावे असेही सूचना काहींनी अधिकाऱ्यांना मांडल्या. त्याचबरोबर मतदान केंद्राची साफसफाई स्वच्छता वॉशरूम व पाण्याची व्यवस्था करण्याची ही मागणी यावेळी करण्यात आली. शहरात पक्षाचे कोणतेही होर्डिंग बॅनर विनापरवाना नसावे निवडणूक काळात होणारे गैरप्रकार रोखण्याचे जबाबदारी ही यावेळी निश्चित करण्यात आली. गैरप्रकार करणाऱ्यांची हाय काय केली जाणार नाही अशी ही निवडणूक अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. यावेळी गोविंद अग्रवाल, अमृत खलसे, शरद बारी, संजय सूर्यवंशी, डॉ. पंकज गुजर व इतर पक्षाचे लोकप्रतिनिधी प्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन नगरपंचायतला निवडणूक निर्णय अधिकारी नानासाहेब आगळे, तहसीलदार तसेच मुख्याधिकारी व प्रशासक विवेक धांडे आधी मी याबाबतीत सूचना केल्या असुन सगळ्यांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन केले आहे.

## महाराष्ट्र हँडबॉल संघात धीरज शिरसाठची निवड

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव प्रतिनिधी



नुकताच पनवेल येथे झालेल्या १७ व १९ वर्ष आतील मुले व मुली राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत आ. बं. मुलांचे हायस्कूलचा खेळाडू धीरज शिरसाठ याची कर्नाटक येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी ''महाराष्ट्र हँडबॉल संघात'' निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन करण्यात आले. धीरज उल्हास शिरसाठ हा उल्हास शिरसाठ, बिलाखेड तालुका चाळीसगाव यांचा मुलगा आहे. खेळाडू धिरज पवार यास कल्पेश चौधरी क्रिडा शिक्षक, परेश पवार कोच आहेत. धिरज पवारच्या राष्ट्रीय संघात निवडीचे सर्वस्तरांवर अभिनंदन होत आहे.

# रेल्वे विभागाचा प्रगतिशील महाराष्ट्र प्रदर्शनात सहभाग

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी




मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने जळगाव येथे दिनांक ०३ ते दिनांक ०५ नोव्हेंबर पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या 'प्रगतिशील महाराष्ट्र प्रदर्शनात' उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. महाराष्ट्र राज्याच्या प्रगती आणि विकासाची झलक दर्शविणाऱ्या या प्रदर्शनात भुसावळ विभागाने रेल्वेच्या विविध उपक्रमांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवली. भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. पुनीत अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या रेल्वे स्टॉलमध्ये रेल्वेतील प्रवासी सुविधा, विद्युतीकरणाचे शंभर वर्ष, पर्यावरणपूरक उपक्रम, वंदे भारत एक्सप्रेस, अमृत भारत एक्सप्रेस बद्दल माहिती, स्वच्छ रेल्वे अभियान, सुरक्षा आणि तांत्रिक नवकल्पना यांचे माहितीपर प्रदर्शन लावण्यात आले. तसेच रेल्वेतील डिजिटल सेवा, ऑनलाइन आरक्षण प्रणाली, 'एक स्टेशन एक उत्पादन' योजना, आणि स्वदेशी उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांबाबत विशेष माहिती देण्यात आली. या प्रदर्शनी मध्ये खासदार जळगाव स्मिता वाघ, वस्त्रोद्योग मंत्री महाराष्ट्र राज्य संजय सावकारे, आमदार राजू मामा भोळे यांनी भेट दिली. रेल्वेच्या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांनी रेल्वेच्या विविध प्रकल्पांविषयी माहिती घेतली. रेल्वे कर्मचाऱ्यांनी प्रदर्शनादरम्यान नागरिकांच्या शंकांचे निरसन करत ''स्वच्छ रेल्वे हरित रेल्वे प्रगत रेल्वे'' या संदेशावर भर दिला. भुसावळ विभागाने नेहमीप्रमाणेच या प्रदर्शनात रेल्वेच्या प्रगती, सेवा आणि समाजाभिमुख उपक्रमांचे दर्शन घडवून 'प्रगतिशील महाराष्ट्र'च्या प्रवासात रेल्वेचा वाटा अधोरेखित केला.